# दौलत

शून्य आणि वर्तुळ दोन्ही दिसायला सारखे असले तरी दोघांत खूप मोठा फरक आहे. शून्यात आपला एकटेपणा तर वर्तुळात आपली जीवाभावाची माणसं असतात. म्हणूनच जीवनाच्या प्रवासात साथ देणारी माणसं ही प्रेमळ व आपुलकीने दोन शब्द बोलणारी असली कि रस्ता कसाही असो प्रवास सुखकरच होतो. मग तो रस्त्याचा असो वा जिवनाचा !! जपणं आणि साठवणं यातही फार मोठं अंतर आहे. पण साठवली जाते ती संपत्ती, धन आणि जपली जातात ती नाती, माणसं !

जिथे दोन घास प्रेमाने खाता येतील अशी पंगत आणि हक्काने मनमोकळं करता येईल अशी संगत जर आयुष्यात लाभली तर जगण्यातली रंगत वाढत जाते. जग आपल्याला खूप काही शिकवत. ठेच लागून पडलो, तेंव्हाच आपण सांभाळून चालू लागलो न? मग ती ठेच पायाला लागो कि मनाला !! पायाची ठेच शरीर जपायला शिकवते तर मनाची ठेच माणसं ओळखायला शिकवते.

कलियुगाचे पूर्व आहे, प्रत्येकालाच गर्व आहे. मी आहे तर सर्व आहे. नाही तर सारेच व्यर्थ आहे ! असं कोणतच सुख नाही जे आयुष्यभरा-साठी समाधान देईल पण समाधानातच इतकं सुख जे आयुष्यभर पुरत राहील. हसणारे मन आणि हसणारा चेहरा हीच तर खरी दौलत आहे. हसल्याने आयुष्य वाढते तर हसविल्याने आयुष्याचं महत्व....!! हसत हसत जगा आयुष्य फार सुंदर आहे.

सौ. उज्वला श्रीराम प्रमुखे
अमरावती